दि. २८ नोव्हेंबर २०१८

**मा.मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,**

स.न.वि.वि.

दरवर्षी '**सकाळ माध्यम समुहा**'तर्फे घेण्यात येणाऱ्या '**सकाळ चित्रकला स्पर्धा**' या उपक्रमाविषयीचे हे सविस्तर पत्र,आपल्या व आपल्या चित्रकला शिक्षकांच्या माहितीसाठी पाठवित आहोत. '**सकाळ**'तर्फे आमच्या पुणे, नगर, सातारा, मुंबई, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, नांदेड, सोलापूर, नागपूर, अकोला, जळगांव या विभागातर्फे ही स्पर्धा आयोजित केली जाते. या वर्षी ही विद्यार्थीप्रिय स्पर्धा **रविवार, दि.१६ डिसेंबर २०१८** रोजी आयोजित करण्याचे निश्चित केले आहे. या स्पर्धेस विद्यार्थ्यांचा विक्रमी प्रतिसाद मिळतो. आपल्याही शाळेतील विद्यार्थ्यांचा हा सहभाग या स्पर्धेत वाढत्या संख्येने असावा, यासाठी हे विनंतीपत्र.

सकाळ, मुंबई आवृत्तीच्या कार्यक्षेत्रात एकाच दिवशी रायगड, ठाणे, पालघर, मुंबई व नवी मुंबई या सर्व जिल्ह्यात विभागवार केंद्रामध्ये स्पर्धा घेतली जाणार आहे. स्पर्धा केंद्राची माहिती लवकरच प्रसिद्ध होईल.

**स्पर्धेच्या व्यवस्थेचा तपशील –**

**१. स्पर्धेची तारीख – रविवार, दि.१६ डिसेंबर २०१८.**

**२. विद्यार्थ्यांचे चार गट – गट (अ) – पहिली–दुसरी. गट (ब ) – तिसरी–चौथी.**
**गट (क) – पाचवी ते सातवी. गट (ड) – आठवी ते दहावी.**

**३. स्पर्धेची वेळ – गट अ आणि ब – (सकाळी ११.३० ते १२.३०) गट क आणि ड – (सकाळी ९.०० ते १०.३०)**

विजेत्या विद्यार्थ्यांना गटवार प्रशस्तिपत्राबरोबर, खालीलप्रमाणे रोख पुरस्कार देण्यात येतील –

| | राज्यपातळी | विभागपातळी | केंद्रपातळी |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | रू.२५०० | रू.१००० | रू.१०० |
| द्वितीय क्रमांक | रू.२००० | रू.७५० | रू.७५ |
| तृतीय क्रमांक | रू.१५०० | रू.५०० | रू.५० |
| उत्तेजनार्थ (एकूण ५) | रू.१००० | रू.२५० | प्रशस्तिपत्र |

**(विशेष विद्यार्थ्यांसाठी याच पद्धतीने गटवार पुरस्कार दिले जातील)**

४. कोणत्याही गटासाठी रंगसाहित्याच्या विशिष्ट माध्यमाचे बंधन नाही. चित्र कोणत्याही रंगसाहित्याने रंगवावे.

५. स्पर्धेचा निकाल जानेवारी २०१९ मध्ये तिसऱ्या किंवा चौथ्या आठवड्यात, 'सकाळ'मधून जाहिर केला जाईल. त्यानंतर पुणे विभागीय आणि राज्य पातळीवरील विजेत्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ आणि चित्रांचे प्रदर्शन पुणे येथे आयोजित करण्यात येईल. केंद्र पातळीवरील विजेत्या विद्यार्थ्यांची बक्षिसे आणि प्रशस्तिपत्रके संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांकडे पोचविण्यात येतील. संबंधित शाळांमध्ये समारंभपुर्वक ही बक्षिसे यशस्वी विद्यार्थ्यांना द्यावीत, अशी विनंती आहे.

**६. स्पर्धेत भाग घेण्यासाठी विद्यार्थ्यांना किंवा शाळेला कोणतीही प्रवेश फी नाही. चित्र काढण्यासाठी कागदही 'सकाळ'तर्फे दिला जाईल. रंग साहित्य मात्र ज्याचे त्याने आणावयाचे आहे.**

७. स्पर्धा होणाऱ्या प्रत्येक केंद्रातील स्पर्धा स्थळाचे सविस्तर नाव, पत्ते आणि स्पर्धेच्या गटवार वेळा डिसेंबरच्या दुसऱ्या व तिसऱ्या आठवड्यात प्रसिद्ध केल्या जातील.

**८. विद्यार्थ्याने त्याच्या गावा–घराजवळच्या स्पर्धा केंद्रावर वेळेवर उपस्थित राहून स्पर्धेत भाग घ्यावयाचा आहे.**

९. स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी शाळेमार्फत पुढीलपैकी, कोणत्याही एकाच पत्त्यावर, सोमवार दि.१० डिसेंबर २०१८ पर्यंत पाठवावी.

नवी मुंबई : सकाळ भवन, प्लॉट नं. ४२-बी, सेक्टर-११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६०४.

परळ : जैन हाऊस, ३ रा मजला, जेरबाई वाडिया रोड, टाटा हॉस्पिटलजवळ, परेल, मुंबई - ४०० ०१२. फोन. २४१०४५६४/ २४१०४५६९ / २४१०४५७२.

ठाणे कार्यालय : ७, जिंजा अपार्टमेंट, दमाणी इस्टेट, जुना मुंबई-आग्रा रोड, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२. फोन नं. ०२२-२५४२३४२२.

विरार कार्यालय : शॉप नं. २४, दुसरा मजला, मिर्झा टॉवर्स, रेल्वे स्टेशनसमोर, विरार (पूर्व), जि. ठाणे - ४०१ ३०३. फोन नं. ९५२५० - २५२०००१.

डोंबिवली कार्यालय : १०३, मनोरमा निवास, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व) - ४२१२०१. फोन नं. ०२५१ - २८६००५६ / २८६१३१५.

अलिबाग कार्यालय : शॉप नं. ७, 'कृष्णवंदन', जे. आर. एच. कन्याशाळेसमोर, अलिबाग - ४०२ २०१. फोन नं. - ०२१४१ - २२४८३३.

कळावे, लोभ असावा, ही विनंती.

कळावे,
आपले,
**सकाळ मीडिया प्रा. लि. करिता,**

**महेंद्र पिसाळ**
**चीफ ऑपरेटींग ऑफिसर**

**श्रीराम पवार**
**संचालक –संपादक**